# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ च महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (अधिष्ठाता कार्यालय)

एम. आय. डी. सी. कॉम्पलेक्स रोड, गडचिरोली –४४२६०५ (महाराष्ट्र)

Email:- dean.sci.tech@unigug.ac.in, dean.humanities@unigug.ac.in


पत्र क्र. गोवि./अधि.कार्या./2862/२०२३ दिनांक: ११.०८.२०२३

## परिपत्रक

**विषय:- २१ ऑगस्ट, २०२३ रोजी आंतरराष्ट्रीय उद्यमिता दिवसाचे आयोजन करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांतील प्राचार्यांना कळविण्यात येते की, संयुक्त राष्ट्र संघाच्या वतीने उद्यमिता दिवस आयोजित करण्याचे आवाहन जगातील सर्व देशांना करण्यात आलेले असून त्याकरीता दर वर्षी २१ ऑगस्ट हा दिवस निश्चित करण्यात आलेला आहे.

आपल्या देशातही पंतप्रधान नरेंद्र मोदी आत्मनिर्भर भारत करण्याकरीता जिवापाड मेहनत करीत असुन यासंदर्भात युवकांनी नोकरी मागणारे न होता नोकरी देणारे होण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन ते करीत असतात. युवकांनी स्व रोजगार सुरू केल्यास देश लवकर आत्मनिर्भर होईल. त्यासंबंधी विद्यापीठातील सर्व महाविद्यालयात येत्या “२१ ऑगस्ट रोजी उद्यमिता दिवस” चे आयोजन करण्यात यावे. या कार्यक्रमात महाविद्यालयांनी उद्योग करीत असलेल्या आपल्याच माजी विद्यार्थ्यांना बोलावून त्यांचे व्यावसायिक अनुभव विद्यार्थ्यांसमोर टेवले तर विद्यार्थ्यांना उद्योग सुरू करण्याकरीता प्रोत्साहन मिळू शकेल.

त्याअनुषंगाने देश आत्मनिर्भर करावयाच्या दृष्टीने २१ ऑगस्ट रोजी उद्यमिता दिवसाचे आयोजन आपल्या महाविद्यालयात करण्यात यावे व त्यासंबंधीचा अहवाल विद्यापीठाच्या अधिष्ठाता कार्यालयास सादर करावा.

11.8.2023

(डॉ. अनिल चिताडे)
अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी -**

१. मा. कुलगुरू कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२. मा. प्र-कुलगुरू कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३. मा. कुलसचिव कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४. प्रा. अनिल सोले, प्रांत समन्वयक, स्वावलंबी भारत अभियान, विदर्भ प्रांत यांना माहितीस्तव सविनय सादर.
५. श्री. अमोल खोडवे, सिस्टीम ॲनालिस्ट, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांनी सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रकाशित करावे व विद्यापीठाशी संलग्नित सर्व प्राचार्यांना अवगत करावे.

F:\Notesheets\Letters